# डॉ.फिक्सिट हिटशिल्ड ऑन गर्मी गॉन




**पिडीलाईट तर्फे भारतातील पहिले वीज वाचवणारे उष्णाता प्रतिबंधक एक्सटिरियर कोटिंग**

मुंबई दि. १७ - भारतात प्रथमच पिडीलाईट हिटशिल्ड हे उष्णता कमी करणारे एक्सटिरियर कोटींग आणणार असून या कोटिंगमुळे तापमान ५ ते ६ डिग्री सेंटिग्रेडने कमी होऊन तुमची इमारत या उन्हाळ्यात कमी तप्ते.

पिडीलाईटच्या डॉ. फिक्सिट हिटशिल्ड या अत्याधुनिक उत्पादनामुळे आपल्या इमारतीचे तापमान खूपच (७५ टक्के) कमी होते म्हणजेच या मुळे सूर्याची उष्णता वातावरणात कमी फेकली जाते. यामुळे उच्च दर्जाचा तसेच उष्णतेपासून मोठ्या प्रमाणावर मुक्ती मिळतेच पण त्याच बरोबर अल्ट्रो व्हायोलेट किरणांपासूनही बचाव होतो.

डॉ. फिक्सट हिटशिल्डच्या वापरामुळे वीजेच्या बिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर बचत होते. कारण यामुळे एअरकंडिशनर आणि एअरकूलचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होतो. याचा उपयोग विविध प्रकारच्या छतांवर तसेच कॉंक्रिट, अॅस्बेस्टॉस आणि धातूंच्या उष्णता वाढणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या छतावर करता येतो. या हिटशिल्डचा मोठा फायदा हा की तो उष्णता रोधक असून त्यामुळे सूर्याच्या मोठ्या प्रमाणावरील उष्णतेस अधिक काळ तग धरून राहते.

या विषयी बोलतांना पिडीलाईट इंडस्ट्रीज लिमिटेडच्या कंन्स्ट्रक्शन केमिकल्स विभागाच्या विक्री आणि मार्केटिंगचे प्रमुख अवधेश रेगडे यांनी सांगितले की, हे नवीन आणि परिणामकारक डॉ. फिक्सिट हिटशिल्ड भारतीय वातावरणासाठी तयार करण्यात आले असून ते विषम अशा उष्णतेत तग धरून अल्ट्रा व्हॉयलेट किरण तसेच इन्फ्रा रेड किरणांपासून बचाव करते. याचा उपयोग निवासी, व्यावसायिक तसेच औद्योगिक इमारतींसाठी अतिशय योग्य आहे.

हिटशिल्डमध्ये कोणत्याही प्रकारची मानवनिर्मित घातक रसायने नसल्याने हे पर्यावरणास अनुकूल असे आहे. या उत्पादनास सिंगापूर एन्व्हायरनमेंट काऊन्सिलकडून 'ग्रीन लेबल प्रॉडक्ट' म्हणून मान्यता मिळाली आहे. हे उत्पादन यापूर्वी सिंगापूर आणि दुबईत यशस्वी झाले असून आता ते भारतातही आणण्यात येत आहे.

## पिडिलाईट इंडस्ट्रीज लिमिटेड विषयी

पिडीलाईट ही ग्राहकोपयोगी आणि स्पेशालिटी केमिकल्स भारतात आणणाऱ्या महत्वपूर्ण कंपन्यांपैकी एक असून कंपनीच्या एकूण विक्रीपैकी दोन तृतीयांश भाग हा भारतात सुरू केलेली उत्पादने आणि विभागांकडून येतो. त्यांच्या उत्पादनांमध्ये अॅडहेसिव्ह आणि सिलेंट्स, बांधकाम आणि रंग रसायने, ऑटोमोटिव्ह केमिकल्स, आर्ट मटेरियल्स, इंडस्ट्रीयल अॅडहेसिव्ह, इंडस्ट्रीयल अँड टेक्स्टाईल रेझिन्स, ऑरगॅनिक पिगमेंट्स आणि प्रिपेरेशन्स यांचा समावेश आहे. बहुतेक उत्पादने त्यांनी स्वतः केलेल्या संशोधन आणि विकासातून तयार झालेली आहेत.